प्रेसनोट

नंदुरबार
दिनांक १८.०९.२०२५

आलोसे — भैरवनाथ शिवाजी मोरे, वय ३५ वर्षे, कनिष्ठ लेखापाल, उप कोषागार कार्यालय, तळोदा, जि.नंदुरबार

आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडून २४००/— रु लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम,१९८८ अन्वये कारवाई केलेबाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | नंदुरबार |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक | तळोदा पो.स्टे. गु.र.क्र. २६४/२०२५, |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम,१९८८<br>दाखल दिनांक १७.०९.२०२५ |
| आरोपीचे नाव, वय व कार्यालय | भैरवनाथ शिवाजी मोरे, वय ३५ वर्षे<br>नेमणूक— कनिष्ठ लेखापाल, उप कोषागार कार्यालय, ता. तळोदा, जि.नंदुरबार |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लाचेची रक्कम रु.२४००/— स्विकारली |
| थोडक्यात माहिती | तक्रारादार, वय २१ वर्षे, यांची आई शासकीय आश्रमशाळा, बोरद, ता.तळोदा,जि.नंदुरबार येथे कामाठी पदावर नेमणूकीस आहे. आलोसे यांनी मागील वर्षी तक्रारदार यांचे आईचे वेतनवाढीचे फरकाचे देयक तयार करुन दिले होते तसेच त्यांचे आईचे सन २०१६ पासूनचे प्रलंबित असलेले प्रोत्साहन भत्त्याचे देयक रु.१,४३,२५०/— मंजूर होणेकामी शासकीय आश्रमशाळा, बोरद येथील मुख्याध्यापकांनी उप कोषागार कार्यालयात मंजुरी करीता पाठविले होते. आलोसे यांनी सदर देयक तपासून मंजूरीकामी सहायक लेखाधिकारी यांचेकडे पाठविले. आलोसे यांनी तक्रारदार यांचे आईचे वेतनवाढीचे फरकाचे देयक तयार करुन दिल्याच्या, प्रोत्साहन भत्त्याचे देयक मंजूरीकामी सहायक लेखाधिकारी यांचेकडे पाठविल्याच्या मोबदल्यात तसेच तक्रारदार यांचे आईच्या मागील ०६ महिन्यांच्या पे स्लिप काढून दिल्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे २४००/— रु. बक्षिस स्वरुपात लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम उप कोषागार कार्यालय, तळोदा येथे तक्रारदार यांचेकडून स्विकारल्याने यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली. |
| सापळा कारवाई | **सापळा अधिकारी व अंमलदार**<br>१. पोउपअधीक्षक प्रशांत भरते<br>२. सहा पोउपनि विलास पाटील<br>३. पोहवा/ ३२, देवराम गावीत<br>४. पोहवा/९६७, विजय ठाकरे<br>५. पोहवा/६७, हेमंतकुमार महाले<br>६. पोहवा/१०४८, नरेंद्र पाटील,<br>७. पोहवा/११२८, जितेंद्र महाले,<br>८. पोना/३५६, सुभाष पावरा<br>सर्व नेमणूक ला.प्र.वि.नंदुरबार घटक |
| मार्गदर्शन | १. मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक<br>२. मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, १२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार
संकेतस्थळ :— https://acbmaharashtra.gov.in
ई मेल :— dyspacbnandurbar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— २५६४—२३१००९

प्रशांत भरते
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार